# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०— २५६९ १२३३
२५६० १२५७
२५६० १२५८
२५६० १२५०
२५६२ ११८८

**शैक्षणिक विभाग**
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०—२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ—मेल : affiliation@pun.unipune.ac.in

दिनांक : २७/०६/२०२०

संदर्भ क्र.: सीए/४०७

प्रति,

**मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य/संचालक,**
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२१—२२ या वर्षाकरिता महाविद्यालये बंद करणे/मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करणे/अभ्यासक्रम बंद करणे अथवा विद्यार्थी संख्येत घट**

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१—२२ साठी महाविद्यालय/परिसंस्था बंद करणे/अभ्यासक्रम बंद करणे अथवा विद्यार्थी संख्येत घट करणे याबाबतचे प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दि. १ ऑगस्ट, २०२० रोजी किंवा त्यापूर्वी सादर करणे बंधनकारक आहे. सदर अर्ज Online पद्धतीने भरावयाचे असून ते विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर BOD online -> College Users-> Affiliation मध्ये 'Closure' या लिंक मध्ये उपलब्ध आहेत.

तसेच ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या अर्जाची प्रिंट काढून सदर अर्जाची प्रत (Hard copy)मा. अध्यक्ष/सचिव यांचे मार्फत (संस्थेच्या कव्हरिंग लेटरहेडसह) दि. १ ऑगस्ट, २०२० रोजी किंवा त्यापूर्वी शैक्षणिक विभागात सादर करावेत. ऑनलाईन प्रस्तावासोबत संस्थेचा ठराव जोडून अखिल भारतीय तंत्र शिक्षण यांच्या अखत्यारीतील अभ्यासक्रमांना अॅप्रुव्हल हॅन्डबुक प्रमाणे विद्यार्थीसंख्येचा उल्लेख करण्यात यावा या संदर्भातील आवश्यक ती संबंधित कागदपत्रे प्रस्तावासह सादर करावीत. दि. १ ऑगस्ट, २०२० नंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपली,

27/6/2020

सहायक कुलसचिव
(शैक्षणिक विभाग)